श्री. राऊत भाऊसाहेब शिवाजी, परिचर, प्रा. आ. केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. प. अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी व सादरकर्ता अधिका-याची नेमणुक करणे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद परिपत्रक क्र.साप्रवि-१/आस्था-४/०८/591/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरीत नमुद केल्याप्रमाणे

वाचा - १. वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र. आरोग्य/आस्था/वशि/२५८/२०२५ दि.०९/०९/२०२५

२. कार्यालयीन दोषारोपपत्र आदेश क्रं साप्रवि-१/आस्था-४/०८/४९०/२०२५ दि. ०९/१०/२०२५

३. श्री. राऊत, परिचर यांचेकडील दि. २७/१०/२०२५ रोजीचा लेखी खुलासा

४. मा. राज्यमंत्री,महसुल, ग्रामविकास बंदरे,खार जमिनी विकास, विशेष सहाय्य, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र डिइएन-२०२२/प्र. क्र. १३४/आस्था-१२ दि. २२/०६/२०२२

५. कार्यालयीन आदेश साप्रवि-१/आस्था-४/१४६८/२०१२ दि. ०१/११/२०१२

६. कार्यालयीन आदेश साप्रवि-१/आस्था-४/१६५९/२०१२ दि. २६/१२/२०१२

७. अपर आयुक्त नाशिक,नाशिक यांचेकडील आदेश दि. १२/०४/२०२१

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.३ नुसार

९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.५ नुसार

श्री. राऊत भाऊसाहेब शिवाजी, परिचर, प्रा. आ. केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. प. अहिल्यानगर हे अनधिकृत गैरहजर असल्याने संदर्भ क्र. ४ अन्वये संदर्भ क्र.५,६,७ आदेश रद्द होऊन श्री. राऊत, परिचर भविष्यात अशा प्रकारचा कसुर करू नये म्हणून त्यांची देय वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्यात आली होती. परंतु श्री. राऊत, परिचर हे दिनांक ०७/०१/२०२५ पासून आजतागायत एकूण २६१ दिवस अनधिकृत गैरहजर असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद, सेवा (शिस्त व अपील) नियम १९६८ चे नियम ३ चा भंग केला आहे.

उक्त संदर्भ क्रं. २ अन्वये श्री. राऊत, परिचर यांचेविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्यात आले असुन संदर्भ क्रं.३ अन्वये श्री. राऊत, परिचर यांचेकडील दि. २७/१०/२०२५ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप त्यांनी अमान्य केलेले आहेत.

यास्तव श्री. राऊत, परिचर यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमाच्या तरतुदीनुसार श्री. राऊत, परिचर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी संदर्भ क्रं. ८ चे तरतुदीनुसार विशेष चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे.

सदर विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच संदर्भ क्रं. ६ चे तरतुदीनुसार प्रस्तुत विभागीय चौकशीकामी अहिल्यानगर जिल्हा परिषदेची बाजु मांडणे करिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. सुनिल जाधव, कार्यालयीन अधिक्षक, पंचायत समिती श्रीगोंदा यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं. १ व २ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्रं. ३ व ४ मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. 202511280401९९ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 19:56:55
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा,
सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि प कर्मचारी)
आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री. राऊत, परिचर, प्रा. आ. केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यव्हार संचीका पृष्ठ क्रं.१ ते 53 यासमवेत जोडले असुन विभागीय चौकशी करुन अहवाल सादर करावा.

२. श्री. सुनिल जाधव, कार्यालयीन अधिक्षक, पंचायत समिती श्रीगोंदा
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा.

२/-सदर आदेश श्री. जाधव, कार्यालयीन अधिक्षक व श्री. राऊत, परिचर यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच सादर करावी.

प्रत :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
२. वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र काष्टी, ता. श्रीगोंदा